# वार्षिक अहवाल
# दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र
# विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे.
# शैक्षणिक वर्षे २०२२-२३

**समन्वयक - प्रो. डॉ. सर्जेराव गोल्डे** **सदस्य - प्रा. निलेश पाटील**

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचा दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्राचा वार्षिक अहवाल देतांना मला मनस्वी आनंद होतो की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्याशी संलग्न असलेले खानदेशातील एकमेव दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र विद्यावर्धिनी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून कार्यरत असून या विभागामध्ये महाराष्ट्र शासनाव्दारे घोषित केलेल्या विविध २१ प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना नाममात्र प्रवेश शुल्कामध्ये म्हणजे रु. १००/- मध्ये प्रवेश दिला जातो. तसेच या विभागामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे/ उपक्रमाचे आयोजन करुन त्यांच्यातील विविध सुप्त कलागुणांना चालना देण्याचे काम केले जाते.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये या विभागात एकुन १६ दिव्यांग विद्यार्थी एफ.वाय.बी.ए., एस. वाय.बी.ए., टी.वाय.बी.ए., एम.ए. व एम.कॉम. या वर्गात प्रवेशित असून यापैकी ११ विद्यार्थी अंध असून ०६ इतर प्रकारचे दिव्यांग आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील दिव्यांग विभागाव्दारे विविध प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. जसे शंभर रुपयामध्ये महाविद्यालयात प्रवेश, अभ्यासक्रमाचे रेकॉर्डिंग, अद्ययावत सॉफ्टवेअरसह तीन संगणक, ब्रेल लिपीतील पुस्तके, ब्रेल लिपीमधील त्रैमासिक, विद्यापीठाच्या परीक्षेचे पेपर लिहिण्यासाठी लेखनिक उपलब्ध करुन देणे, व्हिल चेअर, समाजकल्याण विभाग व इतर सामाजिक स्वंयसेवी संस्थाकडून शिष्यवृत्ती मिळवून देण्यामध्ये मदत करणे, वेगवेगळया ठिकानी नोकरीची संधी असल्यास विद्यार्थ्यांना कळविणे त्याची माहिती देणे व त्यांचा फॉर्म भरुन देणे इत्यादी. या विद्यार्थ्यांना फक्त दिव्यांग विभागच मदत करतो असे नाही तर महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी, राष्ट्रीय छात्र सेनाचे विद्यार्थी व इतर सर्वच विद्यार्थी विविध प्रकारची मदत दिव्यांग विद्यार्थ्यांना नेहमीच करत असतात. विशेष बाब म्हणजे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडे या विभागासाठी एखादी वस्तु मागितली असता ती मागणी तात्काळ पुर्ण केली जाते. याचाच एक भाग म्हणून यावर्षी विभागाला अद्ययावत एक संगणक उपलब्ध करुन दिले आहे. या निमित्ताने मी सर्वांनाच धन्यवाद देतो व आभार मानतो.

**दिव्यांग विभागामध्ये यावर्षामध्ये खालील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.**

दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी जागतिक पांढरी काठी दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी 'हेलन केलर व लुई ब्रेल' यांच्या प्रतिमेला अप्पर जिल्हाधिकारी मा. गोविंद दानेज, संस्थेचे चेअरमन मा. अक्षयभाऊ छाजेड व डॉक्टर अभिनय दरवडे यांच्या हस्ते माल्यार्पन करण्यात आले. याप्रसंगी

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र विसपुते, समन्वयक डॉ. सर्जेराव गोल्डे, प्रा. निलेश पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. पंजाबराव व्यास, दिव्यांग विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

दिनांक ०३ डिसेंबर २०२२ रोजी 'जागतिक दिव्यांग दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र विसपुते, वि.व.ग.कौ सदस्या प्रा. डॉ. जे. एम. गावित यांच्या हस्ते 'हेलन केलर व लुई ब्रेल' यांच्या प्रतिमेला माल्यार्पन करण्यात आले. याप्रसंगी दिव्यांग विद्यार्थी, समन्वयक डॉ. सर्जेराव गोल्डे, प्रा. निलेश पाटील, व इतर प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये दिव्यांग विभागामार्फत **हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि.मुंबई** यांच्याकडे महाविद्यालयातील दिव्यांग व इतर एस.सी., एस.टी व ओबीसी या संवर्गातील एकून ५० विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये दिव्यांग विभागामार्फत ०६ दिव्यांग विद्यार्थ्यांचे **हेल्प द ब्लाईंड फाऊंडेशन चेन्नई** यांच्याकडे शिष्यवृत्ती साठी ऑनलाईन फॉर्म भरुन देण्यात आले होते. या संस्थेने सहा दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १०,०००/- असे एकुन रु. ६०,०००/- त्यांच्या बँक खात्यामध्ये ऑनलाईन जमा केले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये नेत्रदीप प्रतिष्ठान, मुंबई यांच्याकडून दिव्यांग विद्यार्थी कुणाल पाटील, प्रविण कारंडे व सावित्री सोनवणे यांना प्रत्येकी रु.२५०/- ची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यावर ऑनलाईन जमा झाली.

दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरीय परीक्षेच्या काळात लेखनिकांची आवश्यकता असते. या वर्षी लेखनिकांची कामे ही वैशाली देसाई, मारथी पिंपळसे, अंकिता देसाई, अर्चना गावित, किर्ती पावरा व लक्ष्मी पवार या कनिष्ठ महाविद्यालयातील ११ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थीनींनी केले. या बद्दल सर्व लेखनिकांचे दिव्यांग विभागाच्यावतीने विशेष धनयवाद. दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक उपलब्ध करुन देण्याचे काम कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. पी. ओ. व्यास, व कनिष्ठ महाविद्यालयातल सर्वच प्राध्यापक वृंद करतात. तसेच सर्व कार्यालयीन कर्मचारी बंधु हे देखिल दिव्यांग विभागाला व विद्यार्थ्यांना नेहमीच सहकार्य करतात. या निमित्ताने विद्यापीठ, संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांचे आभार व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

धन्यवाद !

समन्वयक
(प्रो. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे)
दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र
विद्यावर्धिनी महाविद्यालय,धुळे.